# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र ०२२ २६५४ ३०३५/२६५३ ०२८३
ई मेल - cap@exam.mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

संदर्भ : परिक्षा/कें.मु.कें./1028/२०१५.

दिनांक : ०२/०५/२०१५.

## परीपत्रक

**बी.एससी. (ईंफॉरमेशन टेक्नॉलॉजी) ( B.Sc, Information Technology ) या अभ्यासक्रमाचे कोर्सेस आयोजीत करणा-या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की,**

विद्यापीठातर्फे गत दोन वर्षापासून अभियांत्रिकी परीक्षेच्या उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन व नियमनाचे काम संगणकाद्वारे ( On Screen Marking – OSM ) केले जात आहे. प्रथम सत्र २०१५ च्या परीक्षांपासून बी.एससी. (ईंफॉरमेशन टेक्नॉलॉजी) ( B.Sc Information Technology ) या अभ्यासक्रमाचे सेमिस्टर- V व VI परीक्षांचे उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन व नियमनाचे काम संगणकाद्वारे ( On Screen Marking – OSM ) करावयाचे ठरले आहे. त्याअनुषंगाने, संगणकीय मुल्यांकनाबाबत ( OSM ) खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१. उत्तरपत्रिका तपासणीच्या पुर्वीच्या पध्दतीमध्ये उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पानावरील ओ.एम.आर.भाग एक हा फाडुन विद्यापीठास पाठविला जात होता मात्र आता बी.एससी. (ईंफॉरमेशन टेक्नॉलॉजी) (B.Sc Information Technology ) या अभ्यासक्रमाचे सेमिस्टर- V व VI परीक्षांचे उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन व नियमनाचे काम संगणकाद्वारे ( On Screen Marking – OSM ) करावयाचे ठरले आहे त्यामुळे सदर परिक्षेच्या ओ.एम.आर.चा भाग एक कृपया फाडू नये. **विद्यार्थ्यांने लिहिलेली संपूर्ण उत्तरपत्रिका जशीच्या तशी ओ.एम.आर.चा भाग एक न फाडता विद्यापीठास पाठवावी.**

२. संगणकिय मुल्यांकनाबाबत अधिक माहिती हवी असल्यास, केंद्रिय मुल्यांकन केंद्र (चौथा मजला), परीक्षा विभाग, महात्मा फुले भवन, विद्यानगरी, कलिना, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई - ४०० ०९८ येथे आपल्या महाविद्यालयातील मुल्यांकन समन्वयक (CAP Co-ordinater) किंवा संगणक प्रणालीतील माहितीगार शिक्षकांना ( किमान दोन शिक्षक ) पाठवावे. सदर शिक्षक संगणकीय मुल्यांकनाबाबत ( OSM ) प्रशिक्षण/अधिक माहिती घेऊन आपापल्या महाविद्यालयातील संबंधित शिक्षकांना आवश्यकतेप्रमाणे प्रशिक्षण / मार्गदर्शन करतील.

३. संगणकीय मुल्यांकनाबाबत ( OSM ) चे सॉफ्टवेयर आपल्या महाविद्यालयातील संगणकांवर टाकण्याची प्रक्रिया करून दिली जाईल. त्यासाठी माइंडलॉजिक्स या सेवापुरवठेदार कंपनीकडून आपणस संपर्क साधण्यात येईल.

४. आपल्या महाविद्यालयातील मुल्यांकन समन्वयक (CAP Co-ordinater) यांचे नाव, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी तसेच महाविद्यालयाचा ई-मेल याबाबतची माहिती **cap.osm2015@gmail.com** या ईमेलवर तातडीने पाठवावी. तसेच इतर काही शंका असल्यास किंवा अधिक माहिती हवी असल्यास याच ई-मेल वर संपर्क साधावा ही विनंती.

त्याअनुषंगाने, सदर परीपत्रक महाविद्यालयाच्या / संस्थेच्या सुचना फलकावर प्रदर्शित करावे व परीपत्रकातील सुचनांची अंमलबजावणी करावी ही विनंती.

परीक्षा नियंत्रकाकरीता